शाखा क्र. [illegible] मान्यता/७२

पुणे - १०.

प्रति                      दिनांक २८-४-१९७२.

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका/प्राचार्य,

न्यू इंग्लिश स्कूल, कोऱ्हाळे,
ता. बारामती जि. पुणे.

विषय- शाळेच्या प्रथम मान्यतेबाबत.....

महोदय/महोदया,

या मंडळाच्या नियमावली क्र. १९(१) अन्वये मार्च १९७२ मधील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस विद्यार्थी पाठविण्याची प्रथम मान्यता मिळविण्यासाठी केलेला वरील शाळेचा अर्ज या कार्यालयात पोहोचला असून मंडळाच्या योग्य त्या समितीने शाळेचा इ. ११ वीची तपासणी अहवाल व संबंधीत शिक्षण उपसंचालक यांचे अभिप्राय विचारात घेऊन सदर अर्जाची छाननी केली.

याबाबत संबंधीत समितीने घेतलेल्या निर्णयानुसार आपणास कळविण्यात येते की, आपण अर्जात दिलेल्या माहितीवरून आपल्या शाळेत आढळून आलेल्या खालील उणीवा व तसेच शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी तपासणी अहवालामध्ये आपणास निर्देशित केलेल्या अटी यांची त्वरीत पूर्तता करावी व अटींच्या पूर्ततेचा अहवाल जून १९७२ अखेर या कार्यालयास न चुकता पाठवावा.

सदर अहवाल या कार्यालयात पोहोचल्यानंतरच आपल्या शाळेस अंतीम मान्यता देण्यासंबंधीचा विचार मंडळाच्या योग्य त्या समितीमार्फत होऊ शकेल. यासंबंधात लक्षात घेणे इष्ट आहे की, मंडळाने दिलेल्या खालील अटींची पूर्तता करून अटी पूर्ण केल्याबद्दलचे पत्र जून १९७२ अखेर या कार्यालयास मिळेल अशा बेताने पाठविणे आवश्यक आहे तसे न झाल्यास शाळेस मार्च १९७३ चे परीक्षेसाठी विद्यार्थी पाठविणेस परवानगी देणे कदाचित शक्य होणार नाही.

शाळेस निदर्शनास आलेल्या अटी.

१) किमान ५ वर्षे शिकविण्याचा अनुभव असलेल्या ( त्यापैकी २ वर्षे प्रशिक्षणोत्तर शिकविण्याचा अनुभव असावा) प्रशिक्षित पदवीधर मुख्याध्यापकाची नेमणूक करावी.

२) सामान्य विज्ञान आणि पदार्थ विज्ञान रसायनशास्त्र या विषयाच्या अध्यापनासाठी जून १९७२ पासून प्रशिक्षित शास्त्र पदवीधर शिक्षकांची नेमणूक करावी.

३) हिंदी विषय शिकविण्यासाठी योग्य गुणवत्ता असलेले (सिनिअर हिंदी शिक्षक सनद, हिंदी विषयतील पदवीधर किंवा समकक्ष परीक्षा पास असलेले ) शिक्षक नेमावेत.

४) जून १९७२ पासून आणखी 2 प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांची नेमणूक करावी.

५) चित्रकला विषयासाठी किमान डी. टी. सी. पदविका असलेले शिक्षक नेमावेत.

६) शास्त्रीय साधनांनी परिपूर्ण असलेली प्रयोगशाळा पाहिजे.

कृपया सत्वर कार्यवाही करावी व कार्यालयास कळवावे अशी विनंती आहे.

आपला विश्वासू,

(सही)

विभागीय सचिवांकरिता,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे - १०.

माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी पत्राची प्रत

१) शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, ---पुणे----------(शिक्षण निरिक्षक, बृ. मुंबई यांना सादर अग्रेषित).

२) त्यांना विनंती करण्यात येते की, पुढील वर्षी जुलै, १९७२ मध्ये शाळेची तपासणी करताना शाळेने वरील अटींची पूर्तता केली असल्याची खात्री करुन घ्यावी व त्यांच्या निश्चित शिफारसीसह व शिक्षक वर्गाच्या यादीसह इ. ११ वीचे तपासणी अहवाल १५ जुलै १९७२ पर्यंत शिक्षण उपसंचालकांकडे पाठवावेत. म्हणजे उपसंचालकांना सदर अहवाल ३१ जुलै, १९७२ पर्यंत मंडळास पाठविणे शक्य होईल.

२. शिक्षण उपसंचालक, पुणे, मुंबई- नासिक-कोल्हापूर विभाग यांना प्रत अग्रेषित.

त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या विभागातील शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, यांचेकडून संबंधित शाळेचे इ. ११ वीचे तपासणी अहवाल उपलब्ध करुन घेऊन उशीरात उशीरा ३१-७-१९७२ पर्यंतच्या त्यांच्या निश्चित शिफारसीसह या कार्यालयास पाठवावेत, अन्यथा संबंधित शाळांना मार्च १९७३ चे परीक्षेस विद्यार्थी पाठविणेस परवानगी देता येणार नाही.

(३) सचिव, - रयत शिक्षण संस्था, सातारा. -----------------------

त्यांना माहितीसाठी वयोग्य त्या कार्यवाहीसाठी प्रत रवाना. त्यांना विनंती करण्यात येते की मागील पानावर घातलेल्या अटी सत्वर पूर्ण करुन या कार्यालयास कळविण्याची व्यवस्था करावी. म्हणजे त्यायोगे इ. ११ वीस मान्यता देण्याचा प्रश्न लवकरात लवकर विचारात घेता येईल व त्यामुळे विद्यार्थी व पालक यांची गैरसोय होणार नाही.

-x-x-x-x-x-

एच.